# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २५/११/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१६) इतिवृत्त**

दिनांक **२९/३/२००८ रोजी** तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा मंगळवार दि.२५ नोव्हेंबर २००८ रोजी माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "**मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.), उप आयुक्त(प्र.), नगर सचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
२. सौ. अल्पा विकास जैन
३. श्रीमती जयश्री किवळेकर
४. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
५. श्री.जावेद हसन खान
६. श्री. वसंत नरवडे पाटील
७. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
८. श्री. कचरू सोनवणे
९. श्री. कचरू मोरे
१०.श्री. सिताराम सुरे
११. श्री. नारायण कुचे

**<u>विषय क्र. १३६ :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन २००५-२००६ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**<u>संवाद :</u>**

श्रीमती जयश्री किवळेकर: आज आपण विशेष सभेचे आयोजन केले आहे. विषयपत्रिका आणि लेखापरीक्षणचे पुस्तक परवा मिळाल्यामुळे तसेच संघटनेच्या कामानिमीत्त दोन दिवस बाहेरगावी जावे लागल्यामुळे अभ्यास करणेस वेळ मिळालेला नाही. त्यामुळे चर्चाकरणेसाठी काही मुद्दे आणि अभ्यास करण्यासाठी

लागणारा वेळ कमी पडला आहे. त्यामुळे आपणांस विनंती आहे की, हि विशेष सभा आज घेण्यात येवू नये, गेल्या आठ महिन्यांपासून मा.सभापती सभेचे नेतृत्व करतात शहरात स्थायी समितीच्या १६ सदस्यांची वेगळी ओळख आहे. स्थायी समितीच्या सदस्यांना एक वेगळी पॉवर आहे. असा जनतेत संदेश जातो, आठ महिण्यांच्या काळात आपण जे जे आदेश दिले आहे त्याचे पालन प्रशासनाने केलेले नाही. आठ महिन्यांच्या काळात शहराचा आमच्या वॉर्डाचा विकास ठप्प झालेला आहे. मे ते नोव्हेंबर पर्यंत एकही स्पिलओव्हरचे काम झालेले नाही. स.सदस्यांनी बजेटबुक उघडलेले नाही. खेदाने सांगावेसे वाटते की त्याची गरजही भासणार नाही. यास जबाबदार कोण आहे याचे चिंतन केले पाहिजे. विशेष सभेपेक्षा स.सदस्य जे विशेष सदस्य म्हणुन नियुक्त केले जातात त्यांच्या कामाकडे विशेष लक्ष असल पाहिजे. दैनंदिन सुविधा, लाईट, साफसफाई कुठलेच कामे होत नाही. सदरच्या बुकची काही गरज नाही. सभागृहात जे सदस्य बसतात त्यांचे वॉर्डातील कामाकडे लक्ष दयायला पाहिजे, गेल्या आठ महिण्यांपासून कुठल्याच सदस्यांचे कामे झालेली नाही. कुठलेही कामे झालेले नाही, बजेटबुक नाही,स्पिलवर्क नाही, वर्क ऑर्डर दिलेले आहे २% रक्कम भरलेली आहे, ते ही कामे बंद ठेवलेली आहे. यास जबाबदार कोण आहे. ज्यापदासाठी आपली नियुक्ती झाली आहे त्याचे अधिकार काय आहे याचे चिंतन झाले पाहिजे. गेल्या आठ महिण्यांपासून बैठकीत नुसत्या चर्चा होत आहे त्यामुळे अशा सभा होत असतील तर काहीच गरज नाही. प्रशासनाने १० लाख रूपयांचे कामे दिलेली आहे त्याबाबत काय झाले आहे, आदेशीत केलेल्या कामांचे काय झाले ते सांगावे सदरच्या या सभेचे आम्हाला काही महत्व नाही. स.सदस्यांना जनतेचे कामे पाहिजे. मा.सभापतींनी उत्तर दयावे त्याशिवाय सभा चालू देणार नाही.

श्री.नारायण कुचे : मुख्यलेखाधिकारी यांनी जो अहवाल दिला आहे त्यावर अजून अभ्यास पूर्ण न झाल्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात यावी अशी सर्व सदस्याची विनंती आहे.

(सभा तहकूब करावी म्हणून वारंवार स.सदस्यांनी मागणी केली.)

श्री.वसंत नरवडे : संबधीत विषयाचा सर्व सदस्यांचा अभ्यास झालेला नसल्याकारणाने तसेच आलेल्या अहवालावर चर्चा होणेकरीता वेळ देण्यात यावा त्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : अधिवेशन १ तारखेला आहे. स.सदस्यांच्या भावना तीव्र आहेत.

श्री.सतिष कटकटे : हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे तेव्हा अहवाल का आणला. ५ महिण्यांपासून अहवाल आला नाही. मा.माजी सभापती यांनी अर्ध्या विषयावर चर्चा केली आहे. माजी सभापती यांनी १५ दिवसात बैठक लावावी म्हणून सुचना केली होती. बैठक का लावण्यात आली नाही.

मा.सभापती : स.सदस्या श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.कुचे व श्री. नरवडे पाटील तसेच इतर स. सदस्यांची भावना लक्षात घेवून आठ दिवसांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

**नगर सचिव**

**सोबत -** १. सन २००५-२००६ चा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल पुस्तिका.
२. दिनांक २९/३/२००८ रोजीच्या स्थायी समितीची सभेचे इतिवृत्त (विषय क्र.४६८)

**टीप :-** दि.१२/०१/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.१७४ अन्वये ............

*सन २००५-२००६ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर **१. लेखा विभाग, २. आरोग्य विभाग, ३.शिक्षण विभाग , ४. जनसंपर्क विभाग (अहवालाचे पृष्ठ क्रमांक ०५ ते ७५ पर्यंत)** या विभागाच्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय झालेला आहे व सदरचे सभेचा वृत्तांत स्थायी समिती सभा दि.२६/६/२००७ रोजी विषय क्र. ३४ अन्वये कायम झालेले आहे.

*तसेच सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करण्यासाठी दिनांक २९/३/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा (विषय क्र.४६८) तहकूब करण्यात आली. सदरील सभेचे इतिवृत्त यासोबत जोडण्यात येत आहे. सदर इतिवृत्त दि.१/७/२००८ रोजी विषय क्र.४९ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

**या सभेत पृष्ठांक ७६ पासून पुढील लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय अपेक्षित आहे.**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - कार्यक्रम पत्रिका क्रमांक (१६)

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(१) व त्यास अनुसरून अनुसूची-ड, प्रकरण २ चे नियम क्र. ३ आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६६(१) अन्वये.)**

**दिनांक :- २८/११/२००८**

**सु च ना**

दिनांक २५/११/२००८ रोजी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **बुधवार, दिनांक ०३ डिसेंबर २००८ रोजी सकाळी ११.३० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली असून या सभेत खालील विषय विचाराधीन आहेत. करीता या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**विषय क्र. १३६ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन २००५-२००६ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**टीप :-** दि.१२/०१/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.१७४ अन्वये ............

*सन २००५-२००६ च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर **१. लेखा विभाग, २. आरोग्य विभाग, ३.शिक्षण विभाग , ४. जनसंपर्क विभाग (अहवालाचे पृष्ठ क्रमांक ०५ ते ७५ पर्यंत)** या विभागाच्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय झालेला आहे व सदरचे सभेचा वृत्तांत स्थायी समिती सभा दि.२६/६/२००७ रोजी विषय क्र. ३४ अन्वये कायम झालेले आहे.

*तसेच सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करण्यासाठी दिनांक २९/३/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा (विषय क्र.४६८) तहकूब करण्यात आली. सदरील सभेचे इतिवृत्त यासोबत जोडण्यात येत आहे. सदर इतिवृत्त दि.१/७/२००८ रोजी विषय क्र.४९ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

**या सभेत पृष्ठांक ७६ पासून पुढील लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय अपेक्षित आहे.**